# HOTEL AND RESTAURANT ASSOCIATION (WESTERN INDIA)

## एमआयसीई संकटाचा हॉटेल उद्योगाला फटका

## हॉस्पिटॅलिटी क्षेत्रासाठी जीएसटीतील आयटीसी मुद्द्याचा फेरविचार करण्याचे एचआरएडब्ल्यूआयचे सरकारला आवाहन

**मुंबई, जुलै 28:** या महिन्याच्या सुरुवातीला लागू झालेल्या वस्तू आणि सेवा करामुळे (जीएसटी) बैठका, प्रोत्साहनपर उपक्रम, परिषदा आणि प्रदर्शनाशी (एमआयसीई) संबंधित उपक्रमांना मोठा फटका बसला आहे. मूळ राज्याच्या बाहेरच्या राज्यातील हॉटेलांमध्ये आयोजित केलेल्या एमआयसीई उपक्रम तसेच अन्य प्रसंगानुरूप कार्यक्रमांसाठी इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) लागू होणार नाही. ही जीएसटीमधील मोठी विसंगती आहे. त्यामुळे पूर्वनिर्धारित कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर एकतर रद्द करण्यात आले आहेत किंवा ते पुढे ढकलण्यात आले आहेत. एमआयसीई पर्यटन वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. मात्र, त्याच्या विकासाला खिळ बसत असल्याने हॉटेल आणि रेस्टॉरंट्स असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया (एचआरएडब्ल्यूआय) जीएसटीतील या विशेष मुद्द्याचा सरकारनं फेरविचार करावा, असं आवाहन करत आहे.

"भारतभरातील सर्व हॉटेलांमध्ये गेल्या वर्षीच्या याच काळातील बुकिंगच्या तुलनेत या वर्षी एमआयसीई बुकिंगमध्ये सरसकट घट झाली आहे. ॲडव्हान्स बुकिंग रद्द करण्यात आल्या आहेत तर नव्या नोंदणी होत नाहीत. बहुतेक कंपन्या त्यांचे उपक्रम त्यांच्याच राज्यात ज्या ठिकाणी जीएसटीची नोंदणी झाली आहे, तेथेच आयोजित करण्याचा विचार करत आहेत. बहुतेक उद्योग उच्च जीएसटी पचवतीलही, मात्र, आयटीसी शिवाय हे पूर्णपणे अशक्य आहे. एमआयसीई पर्यटन क्षेत्र देशासाठी महत्त्वाचे असून,त्याकडे दुर्लक्ष होऊ नये," असे एचआरएडब्ल्यूआयचे प्रेसिडेंट श्री. दिलीत दातवानी म्हणालेत.

या उद्योगाला लागू केलेल्या जीएसटीच्या टप्प्यांबाबत ते म्हणाले की, "ज्या हॉटेलांच्या खोल्यांसाठी 7500 रु. किंवा त्यापेक्षा अधिक शुल्क आहे, त्यासाठी 28 टक्के जीएसटी दर हा जगातील सर्वाधिक दर असून, त्यामुळे उत्पन्नावर परिणाम होईल. सोबतच, करांचा हा दर जाहीर केलेल्या दरांवर आहे, त्यामुळे या उद्योगक्षेत्रासमोर अनंत अडचणी येतील. त्यामुळे ही अट रद्द करावी आणि प्रत्यक्षात जो व्यवहार

होईल, त्यावर करांची टक्केवारी निश्चित करावी. त्याशिवाय आंतरराज्यीय वास्तव्यासाठी असलेल्या आयटीसीच्या कलमाचाही सरकारने फेरविचार करावा."

महामार्गांवर मद्यास बंदी घालण्याच्या निर्णयानंतर लगेच लागू झालेल्या जीएसटीमुळे अनेक अडथळे आले आहेत. आधीच महसुलात घट झालेली असताना, हे म्हणजे दुहेरी मार पडल्यासारखे आहे. अनेक हॉटेलांसमोर व्यवसायात टिकून कसे राहायचे हा प्रश्न असून, ते एकतर व्यवसाय बंद तरी करतील किंवा त्यांच्या व्यवसायाचा आकार कमी करतील. त्याचा परिणाम म्हणून अनेकांना रोजगार गमवावा लागेल आणि परिणामी विकास थांबेल.

"जे उद्योग एका राज्यात व्यवसाय करतात आणि दुस-या राज्यात एमआयसीई आयोजित करतात, त्यांना आयटीसीचा परतावा न मिळणे ही आदरातिथ्य उद्योगासाठी (हॉस्पिटॅलिटी) जीएसटीतील सर्वात मोठी त्रुटी आहे. एखाद्या व्यवसायाची एखाद्या राज्यात जीएसटी नोंदणी आहे, त्याच राज्यात एमआयसीईचे आयोजन केले तर आयटीसीचा लाभ मिळू शकेल. दुर्दैवाने एकात्मिक वस्तू-सेवा करासाठी (आयजीएसटी) हॉटेल उद्योगाला आयटीसी लागू होणार नाही. केलेल्या खर्चापैकी काही प्रमाणातील परतावा मिळत नसेल तर व्यावसायिकांना त्यांच्या राज्याबाहेर एमआयसीई आयोजित करण्यात काहीही स्वारस्य वाटणार नाही किंवा ते अशा देशात जातील, जेथे कर कमी असतील आणि त्या देशाबाहेर पडत असताना, कराचा परतावामिळू शकेल. या संदर्भात पर्यटन मंत्रालयाशी आमची चर्चा सुरू आहे आणि आम्हाला आशा आहे की, एमआयसीईसाठी आयटीसीच्या मुद्द्यावर योग्य तो तोडगा निघेल," अशी माहिती एचआरएडब्ल्यूआय आणि फेडरेशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट्स असोसिएशन्स ऑफ इंडिया (एफएचआरएआय)चे पास्ट प्रेसिडेंट श्री. कमलेश बारोट यांनी दिली.

दरम्यान, आदरातिथ्य उद्योगाला आलिशान अथवा फाइव्ह स्टार हॉटेलांना लागू होणा-या करांच्या दरांबाबत सुस्पष्ट माहिती मिळाली. यापूर्वी आलिशान हॉटेलांसाठी रुम्सचे दर कितीही असले तरी सरसकट 28 टक्के जीएसटी लागू होणार होता. परंतु आता ज्या हॉटेल्सच्या रुम्सचे दर 7500 रु. किंवा त्यापेक्षा अधिक आहेत, त्याच हॉटेल्सना 28 टक्के जीएसटी लागू होईल.